**ठळक बातम्या**

- जपानी तंत्रज्ञान आणि भारताच्या प्रतिभेचं एकात्मिकीकरण या शतकातल्या तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करू शकतं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर उर्जित पटेल यांची आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती

- न्यायमूर्ती आलोक आराधे आणि विपुल पांचोली यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून घेतली शपथ

**आणि**

- मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची आझाद मैदानात उपोषणाला सुरुवात, सीएसएमटी परिसरात वाहतूक कोंडी

**<><><><>**

जपानी तंत्रज्ञान आणि भारताच्या प्रतिभेचं एकात्मिकीकरण या शतकातल्या तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करू शकतं असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. प्रधानमंत्र्यांनी आज जपानची राजधानी टोकियो इथं भारत-जपान आर्थिक मंचाला संबोधित केलं. जपान हे तंत्रज्ञानाचं तर भारत प्रतिभेचं ऊर्जा भांडार असल्याचं ते म्हणाले.

भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान आणि अंतराळ क्षेत्रात महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवत आहे, तसंच आता भारत आपल्या संरक्षण आणि अंतराळ क्षेत्रांनंतर, अणुऊर्जा क्षेत्रही खासगी क्षेत्रासाठी खुलं करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

जपान हा भारताच्या विकासातील एक महत्त्वाचा भागीदार असून, मेट्रोपासून ते उत्पादन क्षेत्र तसंच सेमीकंडक्टरपासून ते स्टार्टअप्सपर्यंत प्रत्येक क्षेत्रात या भागिदारीची परस्पर विश्वासार्हता दिसून येते असं त्यांनी सांगितलं. आज अवघ्या जगाचं भारतावर लक्ष लागलं असून, जग भारताकडून आशा बाळगत असल्याचंही त्यांनी सांगितलं. आज भारत हा जगातली वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचंही ते म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांनीही या मंचाला संबोधित केलं. जपानचं प्रगत तंत्रज्ञान आणि भारताची प्रतिभा एकमेकांना पूरक असल्याचं ते म्हणाले. भारताच्या मेक इन इंडिया उपक्रमात अनेक जपानी कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. दोन्ही देशांमध्ये झालेले नवे सहकार्य करार हे भारतात गुंतवणूक वाढवण्याच्या जपानच्या वचनबद्धतेचे प्रतिक असल्याचंही ते म्हणाले.

त्याआधी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या जपान दौऱ्यासाठी सकाळी टोकियो इथं दाखल झाले. यावेळी त्यांचं उत्साहात स्वागत केलं गेलं. या दौऱ्यात प्रधानमंत्री टोकियोमध्ये होणार असलेल्या पंधराव्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील.

या शिखर परिषदेदरम्यान, दोन्ही नेते परस्परांतल्या द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेणार आहेत. तसंच गेल्या ११ वर्षांत वृद्धिंगत होत असलेली धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी पुढे नेण्याच्या दृष्टीनंही चर्चा होण्याची अपेक्षा आहे. जपानच्या दौरा आटोपून प्रधानमंत्री चीन दौऱ्यावर जाणार आहेत. तिथं ते तियानजिन इथं होणार असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत ते सहभागी होतील.

**<><><><>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांसाठीचे स्कोप एमिनन्स पुरस्कार आज नवी दिल्ली राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम हे आर्थिक विकास आणि सामाजिक समावेशनाचं एक शक्तिशाली साधन ठरले आहेत, असं राष्ट्रपती या पुरस्कार सोहळ्याला संबोधित करताना म्हणाल्या. सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांनी औद्योगिकीकरण, पायाभूत सुविधा विकास, सामाजिक उन्नती आणि संतुलित प्रादेशिक विकासाचा पाया घातल्याचंही मुर्मू यावेळी म्हणाल्या.

**<><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर उर्जित पटेल यांची आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती झाली आहे. यासंबंधी कार्मिक मंत्रालयानं आदेश जारी केला.

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं जारी केलेल्या आदेशानुसार, पटेल यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. उर्जित पटेल यांनी याआधी भारतीय रिझर्व्ह बँकेचे 24 वे गव्हर्नर म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

**<><><><>**

आज देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जात आहे. क्रीडा दिनाच्या निमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून प्रधानमंत्र्यांनी ज्येष्ठ हॉकी खेळाडू मेज ध्यानचंद यांना श्रद्धांजली अर्पण केली. आजही युवा पिढ्यांना मेजर ध्यानचंद यांच्यापासून प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी संदेशात नमूद केलं आहे. देशातील खेळाडूंना पाठबळ देणं, पायाभूत सुविधा निर्माण करणं आणि भारताला उत्कृष्ट क्रीडांचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी केंद्र सरकार यासाठी वचनबद्ध असल्याचं ही प्रधानमंत्र्यांनी संदेशात म्हटलं आहे.

मेजर ध्यानचंद यांचे कठोर परिश्रम अद्वितीय असून ते देशातील हॉकीसह इतर क्रीडांसाठी प्रेरणादायी असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय युवा आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांनीही राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्तानं नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. तसंच क्रीडा दिवसाचं औचित्य साधत देशात तीन दिवसांचा क्रीडा महोत्सव साजरा केला जात असल्याचं मांडविय यांनी सांगितलं. खेळांना प्रोत्साहन देणारा देश म्हणून भारताची ओळख निर्माण व्हावी, यासाठी या महोत्सवाचं आयोजन केल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली या दोघांनीही आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी त्यांना पदाची शपथ दिली. या दोन दिवसांपूर्वी सरकारने त्यांची नियुक्ती मंजूर केली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २७ तारखेला या दोन्ही न्यायमूर्तींच्या नियुक्तीला मंजुरी दिली होती. यामुळे आता सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांसह मंजूर न्यायधीशांची संख्या ३४ झाली असून, न्यायालयासाठी मंजूर पूर्ण क्षमताही गाठली गेली आहे.

<><><><>

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आझाद मैदानात उपोषणाला सुरुवात केली. उपोषणाला सुरुवात करण्याआधी जरांगे पाटील यांनी आंदोलकांना संयम पाळण्याचं आवाहन केलं. आंदोलनामुळे मुंबईत प्रचंड गर्दी झाली असून काही आंदोलकांनी नवी मुंबईतील वाशी इथं जाऊन तिथं आंदोलन सुरू करावं, अशा सूचना जरांगे यांनी केल्या आहेत. दरम्यान, मराठा आंदोलनामुळे आझाद मैदानाच्या दिशेनं येणाऱ्या विविध मार्गांवर वाहतुक पोलिसांनी निर्बंध घातले आहेत.

मराठा आंदोलनामुळे मुंबई महापालिका परिसरातील सर्व रस्ते, पूर्व द्रुतगती महामार्ग, पूर्व मुक्त मार्गांवर वाहतुकीची कोंडी झाली आहे. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी पूर्व मुक्त मार्गांवर त्यांच्या गाड्या थांबवल्या होत्या. परंतु तिथून अनेकजण पायी आझाद मैदानात दाखल झाले. आंदोलकांनी छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या समोरील रस्त्यावर ठिय्या दिला असल्यान इथली वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली आहे. सुमारे तीन हजार गाड्यांचा ताफा मुंबईत दाखल झाला आहे. पाच हजार लोकांनाच आझाद मैदानात प्रवेश दिला जाणार असं पोलिसांनी आंदोलकांना सांगितलं होते.

<><><><>

बिहारमध्ये सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षण मोहिमेत सुमारे तीन लाख लोकांना संशयास्पद नागरिकत्वावरून नोटीसा बजावल्या आहेत. या मतदार याद्या पुनरिक्षणात या लोकांनी त्यांची ग्राह्य कागदपत्रं जमा केलेली नाहीत. या लोकांचा अधिक तपास केला असता त्यांचं नागरिकत्व संशयास्पद आढळून आलं असून त्यापैकी बहुतांश जण बांगलादेश व नेपाळचे नागरिक आहेत. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, नोटीस दिलेले बहुतांश नागरिक हे पूर्व चंपारण, पश्चिम चंपारण, मधुबनी, किशनगंज, पूर्णिया, कटिहार, अररिया आणि सुपौल या जिल्ह्यांतले आहेत. हे सर्व जिल्हे बिहारच्या सीमावर्ती भागात असून काही नेपाळला लागून आहेत.

<><><><>

बांगलादेशातल्या अंतरीम सरकारनं करदात्यांचा पैसा वाचवण्यासाठी आणि सरकारी तिजोरीवरील खर्चाचा ताण कमी करण्याच्या उद्देशानं भारत--बांगलादेश सीमेजवळील तीन

भू--बंदरे पूर्णपणं बंद करण्याचा तर आणखी एका भू--बंदरावरील कामकाज काही काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती युनायटेड न्यूज ऑफ बांगलादेशनं दिली. निलफामारीतील चिलाहाटी भू--बंदर, चुआडांगा जिल्ह्यातील दौलतगंज भू--बंदर आणि रंगामाटीतील तेंगामुख भू--बंदर बंद करणार असून हबीगंजमधील बल्ला भू-बंदरावरील कामकाज स्थगित केलं आहे. मुख्य सल्लागार प्रा. मोहम्मद युनूस यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यालयात झालेल्या सल्लागार मंडळाच्या बैठकीत या निर्णयाला तत्त्वतः मंजुरी दिली आहे.

**<><><><>**

दक्षिण कोरियाचे माजी अध्यक्ष यून सुक येओल यांच्या पत्नीला लाचखोरीसह अनेक आरोपांखाली अटक करण्यात आली आहे. गेल्या वर्षी अयशस्वी झालेल्या मार्शल लॉच्या प्रयत्नाबद्दल येओल यांनाही जानेवारीमध्ये अटक करण्यात आली होती. दक्षिण कोरियामध्ये माजी राष्ट्रपती आणि माजी प्रथम महिला दोघांनाही तुरुंगात टाकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**<><><><>**

युरोपात लागलेल्या वणव्यात १० लाख हेक्टरपेक्षा जास्त वनक्षेत्राचं नुकसान झालं आहे. हा युरोपातला २०२५ या वर्षातला आतापर्यंतच्या सर्वात भीषण वणवा मानला जात असून, २०२४ मधल्या वणव्यात झालेल्या नुकसानीच्या तुलनेत हे प्रमाण चार पटीनं जास्त असल्याचं वृत्त आहे. हवामान बदलामुळे या वणव्याची तीव्रता जास्त असल्याचं मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे. युरोपीय महासंघ क्षेत्रात आत्तापर्यंत १८०० पेक्षा जास्त वणव्यांची नोंद झाली असून, यामुळे ३८ दशलक्ष टनांपेक्षा जास्त कार्बन डायऑक्साईडचं उत्सर्जन झालं असून, पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचंही तज्ञांनी म्हटलं आहे.

**//<><><><>//**